# नविन मॉर्डन फार्माकॉलॉजी ना-हरकत प्रमाणपत्राबाबत

सर्व नोंदणीकृत होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकांना कळविण्यात येते की, मॉर्डन फार्माकॉलॉजी या अभ्यासक्रमाकरिता परिषदेतर्फे देण्यात येणारे ना-हरकत प्रमाणपत्र (**NOC**) प्रदान केलेल्या वर्षी जर अर्जदारास प्रवेश मिळाला नाही अगर अर्जदाराने प्रवेश घेतला नाही तर सदरचे ना-हरकत प्रमणपत्र पुढील ३ वर्ष कालावधीकरिता वैध राहिल. परंतु अर्जदाराचे नुतनीकरण सदरच्या कालावधीत अद्ययावत नसेल तर रु. ६००/-(पोस्टेजसह) फी आकारुन नविन ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच जर ना-हरकत प्रमाणपत्राचा कालावधी संपुष्टात येंत असेल व नुतनीकरण अद्ययावत असेल तर नविन ना-हरकत प्रमाणपत्रासाठी रु. ३००/-(पोस्टेजसह) फी आकारण्यात येईल. तसेच जर सदरचे ना-हरकत प्रमाणपत्र हरविले असेल किंवा मिळत नसेल तर त्याच्या दुय्यम (डुप्लीकेट) प्रतीसाठी रु. ३००/- (पोस्टेजसह) फी आकारण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

टीप- ना-हरकत प्रमाणपत्राच्या दुय्यम प्रतीसाठी अर्ज करताना अर्ज योग्य कागदपत्रांसह अर्ज करुन रु.३००/- चा (पोस्टेंजसह) धनाकर्ष रजिस्ट्रार, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी मुंबई यांचे नावे सादर करावा.